# "छत्रपती शाहू महाराजांचा दूरदृष्टीकोनातून साकारलेले राधानगरी धरण"

**डॉ. राजेश शंकरराव किरुळकर** सहा. शिक्षक न्यू कॉलेज, कोल्हापूर rajkirulkar@gmail.com

**प्रस्तावना:**

शंभर वर्षापूर्वी आपला देश हा कृषिप्रधान देश होता आणि आजही आधुनिक उद्योगधंद्यांचा विकास होऊनही, तो कृषिप्रधानच समजला जातो. याचे कारण, आजही बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तेव्हा शेतीचा उद्धार म्हणजे शेतक–यांचा उद्धार, पर्यायाने देशाचा उद्धार, हे सूत्र ध्यानात घेऊन राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मूलभूत सुधारणा केल्या. त्याला जोड म्हणून नवनवीन उद्योगधंदे सुरू केले आणि या उद्योगधंद्यांना सहकार तत्त्वाची ऊर्जा दिली. म्हणूनच आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योगधंदे व सहकार या तिन्ही क्षेत्रांत आघाडीवर दिसतो. कोल्हापूरच्या या प्रगतीचा पाया शंभर वर्षांपूर्वी शाहू महाराजांनी घातला. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून शाहू महाराजांनी बांधलेल्या राधानगरी धरणाचा आणि त्यातून शेती तसेच इतर फायद्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचा हेतू / उद्दिष्टे :**

१. शाहू महाराजांनी बांधलेल्या राधानगरी धरणांचा अभ्यास करणे.

२. राधानगरी धरणामुळे कोल्हापूर जिल्ह्याला झालेल्या फायद्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

सदर शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन सामग्री:**

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. यासाठी उपलब्ध संदर्भ ग्रंथ, जर्नल्स तसेच इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

**आशय विश्लेषण:**

**राधानगरी धरणाची पार्श्वभूमी :**

अज्ञान व दारिद्र हे शेतकरी समाजाचे दोन मोठे शत्रू होते. अज्ञानातून आलेले सामाजिक मागासलेपण व दारिद्र्यातून आलेले भौतिक मागासलेपण, अशा संकटात भारतीय शेतकरी सापडलेला असे. त्यातच दुष्काळ व प्लेग यांसारखी संकटे कोसळली की, त्यांच्या दूखास पारावार राहत नसे. शाहू महाराजांचे प्रजाजन बहुसंख्य शेतकरीच होते आणि त्यांची स्थिती हिंदुस्थानाच्या अन्य भागांतील शेतकऱ्यांहून वेगळी नव्हती. आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या पर्वात (स. १८९६–९९), संस्थानात पडलेल्या भयंकर दुष्काळात, महाराजांनी अन्नधान्याचा व गवतचाऱ्याचा वेळीच पुरवठा केल्यामुळे हजारो लोकांचे व जनावरांचे प्राण वाचले होते, हे खरेच आहे. पण एवढ्यावरच त्यांचे समाधान झालेले नव्हते. वारंवार पडणाऱ्या दुष्काळासारख्या संकटांवर कायमची मात करण्याची पायाभूत स्वरूपाची योजना तयार करावी, असे त्यांच्या मनाने घेतले आणि १९०२ साली, त्यांनी आपल्या संस्थानासाठी अपूर्व असे 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले. त्यासाठी लवकरच स्वतंत्र 'पाटबंधारे खाते' निर्माण करून, त्यावर खास 'इरिगेशन ऑफिसर' ची नेमणूक करण्यात आली. या खात्यामार्फत संस्थानातील प्रत्येक गावाची, पाटबंधऱ्याच्या दृष्टीने तपशीलवार पाहणी करण्यात आली. नव्या जुन्या विहिरी, छोटेमोठे तलाव, लहानमोठे बंधारे या सर्वांच्या नोंदी करून, त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. नव्या विहिरी, नवे तलाव व छोटे छोटे बंधारे यांच्या योजना तातडीने अमलात आणल्या जाऊ लागल्या. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक स्रोत अडविण्याचा प्रयत्न सुरू झाला आणि या प्रयत्नांना मुकुटमणी शोभेल, अशी एक भव्य योजना महाराजांनी पुढे आणली. ती म्हणजे कोल्हापूरच्या पश्चिमेस, सह्याद्रीच्या घाटात, भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणाऱ्या (राधानगरी) धरणाची महत्त्वाकांक्षी योजनाच जी पुढे कोल्हापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरली.

कोल्हापूर संस्थानात ह्या योजनेतूनच हरित क्रांतीचा प्रारंभ झाला. हा प्रकल्प म्हणजे माझे जीवितकार्यच. १९०२ साली, शाहू महाराजांनी युरोपचा प्रवास केला होता. या प्रवासात, युरोपियन लोकांनी केलेल्या भौतिक प्रगतीने ते प्रभावित झाले होते. निसर्गातील साधनसंपत्ती त्यांनी मोठ्या कल्पकतेने आपल्या समृद्धीसाठी वापरली होती. युरोपातील धरणे पाहून, आपल्याकडेही अशी धरणे आपण का बांधू नयेत, असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. सह्याद्रीच्या माथ्यावर शेकडो इंच पाऊस पडतो आणि तेथून उगम पावणाऱ्या नद्या पावसाळ्यात दुथडी वाहूनही, प्रचंड जलसंपत्ती समुद्रात नेऊन ओततात. पावसाळा संपला की, त्या नद्या कोरड्या पडू लागतात. सह्याद्रीत कोसळणारे पावसाचे पाणी अडवून देशावरच्या काळ्याभोर तृषार्त जमिनीस दिले गेले, तर ही भूमी खऱ्या अर्थाने 'सुजलाम सुफलाम' होईल, असा आशावाद त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला होता. या अशा विचारातूनच राधानगरी धरणाची संकल्पना साकार झाली. अर्थात कोल्हापूरसारख्या एका लहान संस्थानाने अशा मोठ्या धरणाच्या कामास हात घालणे

म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती, ते एक प्रकारचे शिवधनुष्यच होते. कारण, त्या काळात ते हिंदुस्थानातील सर्वांत मोठे धरण ठरणार होते! असा महान प्रकल्प हाती घेण्यासाठी पहाडासारखे कणखर दिल असणारा राज्यकर्ता असावा लागतो. महाराजांजवळ दुर्दम्य इच्छाशक्ती व असे कणखर दिल होते आणि त्या मागे लोककल्याणाची तळमळ होती. खुद्द महाराज या प्रकल्पास आपले जीवितकार्य समजत होते. आपल्या एका स्नेह्यास लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले होते, ''हा प्रकल्प सिद्धीस गेल्यावर माझे जीवितकार्यच पूर्ण होईल!''

आपल्या या जीवितकार्याचे स्वप्न साकार करण्यासाठी, महाराज आपल्या सर्व शक्तिसामर्थ्यानिशी उभे राहिले होते. कोल्हापूर संस्थानातून सेवानिवृत्त होऊन, मायदेशी गेलेल्या कर्नल फेरिस या इंग्रज अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ''आपण येथून निघून गेल्यावर, मी सुमारे २० बंधारे बांधलेय पण माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही. म्हणून मी आता एक मोठा सिंचन प्रकल्प (Irrigation Scheme) हाती घेणार आहे. संपूर्ण भारतात मोठा (The biggest in India) असा तो प्रकल्प असणार आहे. त्यासाठी मी माझी पूर्ण शक्ती लावत आहे.''

१९०७ साली महाराजांनी धरण बांधणची कल्पना मांडली. जागेचा शोध सुरू झाला. फेजिवडे गावाजवळ भोगावती नदीवर धरण बांधता येईल, असे महाराजांना सांगण्यात आले. जागेची पाहणी करण्यात आली. १९०८ साली फेजीवडेजवळ राधानगरी गाव वसवण्यात आले आणि पुढच्याच वर्षी धरणाच्याव प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली.

९ वर्षात म्हणजे १९१८ पर्यंत १४ लाख रुपये त्यावर खर्ची पडले. धरणाची भिंत सुमारे ४० फूट बांधून पूर्ण झाली होती. हा प्रकल्प राबवताना महाराजांना अनेक आशा निराशेच्या प्रसंगांना सामोरे जावे लागले. तथापि, त्यांच्याजवळ असामान्य जिद्द आणि तळमळ होती. त्यामुळे हा प्रकल्प उभा राहत गेला. धरणात साठणाऱ्या पाण्याच्या साठ्यातून दर वर्षी ६०० दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले. ते पाणी, जशी आवश्यकता भासेल तसे, नदीत सोडण्यात येई. परिणामी, भोगावती (पुढे तीच पंचगंगा होते) नदीच्या दोन्ही तीरांवर बारमास हिरवीगार शेती फुलू लागली. महाराजांचे हरित क्रांतीचे स्वप्न साकार होऊ लागले. दरम्यानच्या काळात कोल्हापूर संस्थानवर काही आर्थिक अडचणी आल्या. निधीचा प्रश्न निर्माण झाला. दुर्दैवानं महाराजांचेही निधन झाले. पण त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी अडी–अडचणींची पर्वा न करता धरण पूर्ण केलं.

राजर्षी शाहू महाराजांनी १९०८ साली या धरणाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली. हे धरण बांधण्यासाठी महाराजांनी दगडी बांधकामाचा प्रकार निवडला या धरणाची उंची ३८–४१ मीटर आहे, तर लांबी १०३७ मीटर आहे . धरणातून पाण्याचा विसर्ग होण्यासाठी ७ स्वयंचलीत दरवाजे बसवले आहेत धरण पूर्ण क्षमतेने भरताच यापैकी एक–एक दरवाजा उघडला जातो. ज्यावेळी राधानगरी धरण १०० टक्के भरेल, त्यावेळी याच दरवाजातून पाण्याचा विसर्ग होतो. अशा पद्धतीचं तंत्र अजून तरी देशातील कोणत्याही धरणावर बसवण्यात आलं नाही.

या धरणाचे बांधकाम रेंगाळत झाले असले तरीही धरणाच्या पायात शिसे ओतून पाया भक्कम करण्यात आला. धरणाचे काम दर्जेदार व्हावे म्हणून खूप कसोट्या लावण्यात आल्या. शाहू महाराजांनंतर छत्रपती राजाराम महाराजांनी धरणाचे काम पूर्णत्वास नेले. दाजीराव अमृतराव विचारे यांच्या देखरेखीखाली हे काम पूर्ण झाले. आणि त्यांचे नाव या परिसरातील एका वाडीस दाजीपूर असे देण्यात आले.

या धरणात साडेसात टीएमसी इतका पाणीसाठा होतो. धरणास मुख्य भिंतीत पाच दरवाजे आहेत. ते क्रेनने उघडता येतात, बंद करता येतात. त्यातून वीजनिर्मितीसाठी पाणी सोडले जातेय पण धरण पूर्ण भरल्यावर धरणाच्या उत्तर बाजूस असलेल्या सात स्वयंचलित लोखंडी दरवाजावर आतल्या बाजूने पाण्याचा दाब पडतो. जसजसा दाब वाढत जाईल तसतसा एक एक लोखंडी दरवाजा वर उचलला जातो व त्या रिकाम्या झालेल्या जागेतून पाण्याचा लोंढा बाहेर पडू लागतो.

सात दरवाजे पाण्याच्या दाबाने उघडतात असे वाचत असले तरी त्यामागे एम. विश्वेवश्वचरय्या यांचे एक तंत्र आहे. या सात दरवाजांना प्रत्येकी ७० टन वजनाचे सिमेंटचे ब्लॉक बांधले आहेत. ते पाण्यात आहेत. पाण्याचा दाब कमी झाला की हे ७० टन वजनाचे ब्लॉक दरवाजांना पुन्हा मूळ जागी आणतात. या दरवाजाची तेल–पाणी घालून नियमित देखभाल ठेवली जाते. अशा स्वरूपाचे दरवाजे भारघर धरणाला आहेत.

**राधानगरी धरण:**

| | |
|---|---|
| धरणाचा उद्देश | : सिंचन, जलविद्युत |
| अडवलेल्या नद्याः प्रवाह | : भोगावती नदी |
| स्थान | : फेजीवडे, राधानगरी तालुका, कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र |
| सरासरी वार्षिक पाऊस | : ५५७० मि.मी. |
| लांबी | : १०३७ मी. |
| उंची | : ३८.४१ मी. |
| बांधकाम सुरू | : १९०९ |

उद्‌घाटन दिनांक : १९५४ 1st Stage: १९०९–१९१८ 2nd Stage: १९३९–१९५४
टोलिता खालील क्षेत्रफळ : १७२३ हेक्टर
जलाशयाची माहिती – क्षमता २३६.७९ दशलक्ष घनमीटर
क्षेत्रफळ : १८.१३ वर्ग कि.मी.
विद्युत उत्पादनासंबंधित माहिती – टर्बाइनांची संख्या २
स्थापित उत्पादनक्षमता : १० मेगावॅट

**शोधनाचे महत्व:**

१. राधानगरी धरणामुळे संपूर्ण जिल्ह्यासाठी शेतीला बारमाही शेतीसाठी आणि पिण्यासाठी मुबलक पानी उपलब्ध झाले. शेतीला योग्य वेळी पानी मिळाल्याने शेती उत्पादनात वाढ झाली.

२. राधानगरी धरणामुळे जिल्ह्यात शेती आधारित लहान मोठे उद्योग–धंदे निर्माण झाले. यामुळे शेतकरी वर्गाला फायदा झाला व तरुणांना रोजगार मिळाला.

३. राधानगरी धरणामुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळाली. **उदा.** राधानगरी धरण, दाजीपुर अभयारण्य इ.

४. राधानगरी धरणामुळे धारण क्षेत्रात विविध पिके, व्यावसायिक पिके वाढू लागली. त्यामुळे शेतकरी वर्गाचे राहणीमान सुधारले.

**निष्कर्ष :**

शेतीच्या क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम युरोपात शेती शास्त्रीय पद्धतीने करून, अन्नधान्याचे उत्पादन आपल्यापेक्षा अनेक पटीने अधिक घेतले जाते, हे महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. तेव्हा, आपल्या शेतकऱ्यांतही शेतकीतील आधुनिक ज्ञानाचा प्रसार व्हायला पाहिजे, या हेतूने महाराजांनी अनेक उपक्रम हाती घेतले. संस्थानात सुधारित शेतीपद्धतीचा प्रसार करण्यासाठी, १९१२ साली, त्यांनी कोल्हापुरात 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन केली. तिला जोडूनच कोल्हापुरात आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियमही सुरू केले. शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, बी–बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, जोतिबा यात्रा अशा प्रसंगी 'शेतकी प्रदर्शने' भरविली जाऊ लागली. अशा प्रदर्शनांतून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहितीपत्रके आदींची मांडणी केलेली असे.

धरणातून पाण्याचा विसर्ग होण्यासाठी ७ स्वयंचलीत दरवाजे बसवले आहेत धरण पूर्ण क्षमतेने भरताच यापैकी एक–एक दरवाजा उघडला जातो. ज्यावेळी राधानगरी धरण १०० टक्के भरेल, त्यावेळी याच दरवाजातून पाण्याचा विसर्ग होतो. अशा पद्धतीचं तंत्र अजून तरी देशातील कोणत्याही धरणावर बसवण्यात आलं नाही.

महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणे कोल्हापूर विभागातही दुष्काळच्या झळा सोसाव्या लागत. त्यामुळे दुष्काळ निर्मूलनासोबतच भविष्यकालीन पाणी नियोजनाचे धोरण शाहू महाराजांनी राबविले. भूजलातून पाणी उपसा न करता नदी, तलावांतील पाणी वापरण्यावर त्यांचा भर होता. जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी वाहून न जाता योग्य प्रकारे साठविले तरच भविष्यातील दुष्काळाला तोंड देता येणे शक्य आहे, याची पुरेशी कल्पना असल्याने राजर्षी शाहू महाराजांनी नवीन सार्वजनिक तळी बांधण्याची मोहीम हाती घेतली, तसेच अस्तित्वात असलेल्या तलावांची दुरुस्ती केली. याशिवाय दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पाटबंधारे खाते निर्माण करून 'इरिगेशन ऑफिसर'ची नेमणूक केली. या पाटबंधारे खात्यामार्फत प्रत्येक गावाची तपशीलवार पाहणी करून १९०२ मध्ये पाटबंधारे धोरण जाहीर केले. इरिगेशन ऑफिसर म्हणून शंकर सीताराम गुप्ते यांची नेमणूक करताना त्यांनी व त्यांच्या कर्मचारीवर्गाने गावागावांत सर्वेक्षणाचे काम कसे करावे, याच्या सूचना आजही मार्गदर्शक ठराव्यात.

**सारांश :**

राजर्षी शाहूंच्या या सोळा भाषणांमधून समाजक्रांतीच्या विचारांची मूळ संहिता दृष्टिपथास येते. या सर्व भाषणांमधून राजर्षींचे पुरोगामी विचार व्यक्त होतात. त्यांनी अनेक सामाजिक समस्यांचा वेध घेतलेला दिसून येतो. विषयांतील वैविध्य, समकालीन प्रश्नांची जाण आणि भान, दुबळ्या माणसांच्या सक्षमीकरणासंबंधी मूलभूत विचार, स्त्री–शुद्रांप्रती कळवळा, पक्की वैचारिक बैठक, आपल्या विचारांवर, भूमिकांवर ठाम राहण्याची वृत्ती, श्रमिक (शेतकरी, मजूर), अस्पृश्य, वंचित, उपेक्षित वर्ग समूहांना प्रकाशात आणण्याची धडपड, परखडपणा, सामाजिक नीतिमत्ता, बौद्धिक स्वातंत्र्य, मागासलेल्या समाजाचा उद्धार, व्यापार, धंदे, कारखानदारी इत्यादी अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक विषयांचा ऊहापोह त्यांनी केला आहे. यातून त्यांच्यात असलेली अभ्यासू वृत्ती, चिंतनाची खोली, नम्रतेचा गुण, आपलेपणाची भावना पाहायला मिळते. स्वातंर्त्य हे माणसास प्रिय असले पाहिजे, असा मूलभूत विचारही ते देतात. ते म्हणतात, 'स्वातंर्त्यासाठी जीव द्या, काय वाटेल ते कराय परंतू तुम्हाला जे पशुप्रमाणे वागवितात, त्यांच्यापासून स्वातंर्त्य मिळवा.' शाहूंचा हाच क्रांतदर्शी विचार या शतकात प्रेरणादायी ठरू शकेल.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. करवीर रियासत स. मा. गर्गे, दुसरी आवृत्ती, पुणे, १९८०.
२. करवीर सरकारचे गॅझेट, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर केशवराव भोसले जन्मशताब्दी विशेषांक: महाराष्ट्र टाइम्स, (सं.) गोविंद तळवळकर, मुंबई, १९९०
३. कोल्हापूर दर्शन– (सं.) ग. रं. भिडे व पु. ल. देशपांडे, पहिली आवृत्ती, पुणे, १९७१
४. 'हंटर'कार खंडेराव गोपाळराव बागल यांचे निवडक लेख– (सं.) माधवराव बागल, कोल्हापूर, १९७४
५. छत्रपती शाहू स्मृतिदर्शन– हिंदुराव साळुंखे, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९९८
६. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे– (सं.) प्र. न. देशपांडे, पहिली आवृत्ती, धुळे, १९८३
७. छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ (सं.) जयसिंगराव पवार, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९९०
८. ६५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कोल्हापूर, १९९२: जरीपटका– (सं.) प्रतापसिंह ग. जाधव, कोल्हापूर, १९९२
९. भारतीय राज्यघटनेचा सोपपत्तिक इतिहास– रा. वि. ओतुरकर व पां. श्री. घारे, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, दुसरी आवृत्ती, पुणे, १९६८
१०. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास– रा. के. लेले, पुणे, १९८४
११. राजर्षी– एक व्यक्तिदर्शन– श्याम येडेकर, कोल्हापूर
१२. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ– (सं.) पी. बी. साळुंखे, मुंबई, १९७६
१३. राजर्षी शाहू छत्रपती– एक समाजक्रांतिकारक राजा धनंजय कीर, पहिली आवृत्ती, मुंबई, १९७९
१४. राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग– वा. द. तोफखाने, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९६३
१५. राजर्षी श्रीशाहू छत्रपती: वाद आणि वास्तव– रमेश जाधव, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, १९९२
१६. राजर्षी शाहू : एक दृष्टिक्षेप– जयसिंगराव पवार, कोल्हापूर, १९८९
१७. राजर्षी श्रीशाहू महाराजांची भाषणे– (सं.) भ. बा. जाधव, पहिली आवृत्ती, कोल्हापूर, १९७१
१८. राजर्षी शाहू: राजा व माणूस– कृ. गो. सूर्यवंशी, पहिली आवृत्ती, पुणे, १९८४
१९. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ– डॉ. जयसिंगराव पवार, पहिली आवृत्ती, कोल्हापूर, २००१
२०. लोकराजा शाहू छत्रपती रमेश जाधव, प्रथम आवृत्ती, पुणे, १९९७
२१. छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र– आ. बा. लठ्ठे, बेळगाव, १९२५
२२. Rajarshi Shahu Chhatrapati Papers] Vol-I(Ed) A- G- Pawar] Kolhapur] 1978
२३. Shahu Chhatrapati A Royal Revolutionary Dhananjay Keer] Bombay] 1976
२४. The Pillar of Social Democracy-(Ed.) P-B- Salunkhe] Kolhapur] 1994.